
# 2. सरावासाठी अधिक प्रश्न

**1.** सोबतच्या आकृतीवरुन खालील कोनांच्या जोड्यांची नावे लिहा.




**(1)** संगत कोन

**(2)** आंतरकोन

**(3)** आंतरव्युत्क्रम कोन

**(4)** बाह्यव्युत्क्रम कोन

उत्तर :

**(1)** संगतकोनांच्या जोड्या :

(i) $\angle l$ व $\angle p$ (ii) $\angle n$ व $\angle s$
(iii) $\angle m$ व $\angle q$ (iv) $\angle o$ व $\angle r$

**(2)** आंतरकोनांच्या जोड्या :

(i) $\angle m$ व $\angle p$ (ii) $\angle o$ व $\angle s$


**(3)** आंतरव्युत्क्रम कोनांच्या जोड्या :

(i) $\angle m$ व $\angle s$ (ii) $\angle o$ व $\angle p$

**(4)** बाह्यव्युत्क्रम कोनांच्या जोड्या :

(i) $\angle l$ व $\angle r$ (ii) $\angle n$ व $\angle q$

**2.** आकृतीमध्ये रेषा **m** ∥ रेषा **n** आणि रेषा $l$ ही छेदिका आहे. तर $m\angle x$ , $m\angle y$ आणि $m\angle z$ च्या किंमती काढा.




उकल : रेषा m ∥ रेषा n आणि रेषा $l$ ही छेदिका आहे.

$\therefore m\angle x = 60^0$ ......... (संगत कोन)

$m\angle x + m\angle y = 180^0$.......... (रेषीय जोडीतील कोन )

$\therefore 60^0 + m\angle y = 180^0$

$\therefore m\angle y = 180^0 - 60^0$

$\therefore m\angle y = 120^0$


$\therefore m\angle y$ आणि $m\angle z$ हे परस्परांचे विरुद्ध कोन आहेत.

$\therefore m\angle y \cong m\angle z$

$\therefore m\angle z = m\angle y = 120^0$

$\therefore m\angle x = 60^0, m\angle y = 120^0 , m\angle z = 120^0$

**3.** सोबतच्या आकृतीमध्ये, रेषा $a$ ∥ रेषा **b** आणि रेषा **m** ही छेदिका आहे.
जर $m\angle r = 65^0$ तर इतर कोनांची मापे काढा, आणि यावरुन निरीक्षण नोंदवा.



उकल : (1) रेषा $a \parallel$ रेषा b ची रेषा m ही छेदिका आहे.

$\because\ m\angle r = 65^0$

$m\angle o + m\angle r = 180^0$.......... (रेषीय जोडीतील कोन)

$m\angle o + 65^0 = 180^0$

$\therefore\ m\angle o = 180^0 - 65^0$

$\therefore\ m\angle o = 115^0$

(2) $m\angle r = m\angle p$.......... (विरुद्ध कोन.)

$\therefore\ m\angle p = 65^0$

(3) $m\angle q + m\angle p = 180^0$ ...........(रेषीय जोडीतील कोन)

$\therefore\ m\angle q + 65^0 = 180^0$

$\therefore\ m\angle q = 180^0 - 65^0$

$m\angle q = 115^0$

(4) $m\angle o + m\angle v = 180^0$ ............. (आंतरकोनांची जोडी)

परंतु $m\angle o = 115^0$

$\therefore\ 115 + m\angle v = 180^0$

$\therefore\ m\angle v = 180^0 - 115^0$

$\therefore\ m\angle v = 65^0$

(5) $m\angle v + m\angle u = 180^0$ ........... (रेषीय जोडीतील कोन)

परंतु $m\angle v = 65^0$

$\therefore\ 65^0 + m\angle u = 180^0$

$\therefore\ m\angle u = 180^0 - 65^0$

$\therefore\ m\angle u = 115^0$

(6) $m\angle t = m\angle v$ .......... (विरुद्ध कोन)

परंतु $m\angle v = 65^0$

$\therefore\ m\angle t = 65^0$


(7) $m\angle s = m\angle u$ ........... (विरुद्ध कोन)

परंतु $m\angle u = 115^0$

$\therefore\ m\angle s = 115^0$

**निरीक्षण :** जर दोन समांतर रेषांना एका छेदिकेने छेदल्यावर तयार होणाऱ्या आठ कोनांपैकी एका कोनाचे माप दिले असेल तर इतर सात कोनांची मापे काढता येतात.

**4.** सोबतच्या आकृतीमध्ये रेषा AB ∥ रेषा CD ची रेषा MN ही छेदिका आहे.
$m\angle APM = 2x + 10$ आणि
$m\angle PQC = x + 35$ तर $x$ ची किंमत काढा.
दिलेल्या मापांवरुन इतर सर्व संगत कोनांच्या जोड्यांची मापे काढा.




उकल :

रेषा AB ∥ रेषा CD ची रेषा MN ही छेदिका आहे.

(1) ∠APM आणि ∠PQC हे परस्परांचे संगत कोन आहेत.

आकृतीमध्ये ∠APM ≅ ∠PQC ....... (I)

परंतु $m\angle APM = 2x + 10$ आणि $m\angle PQC = x + 35$..... (दिलेले आहे)

$\therefore\ 2x + 10 = x + 35$ … … [(I) वरुन]

$\therefore\ 2x - x = 35 - 10$

$\therefore x = 25$

$\therefore\ m\angle APM = 2x + 10 = 2 \times 25 + 10 = 50 + 10 = 60^0$

$\therefore\ m\angle PQC = x + 35 = 25 + 35 = 60^0$

$m\angle APM + m\angle MPB = 180^0$ … . . .. (रेषीय जोडीतील कोन)

परंतु $m\angle APM = 60^0$

$\therefore\ 60^0 + m\angle MPB = 180^0$

$\therefore m\angle MPB = 180^0 - 60^0$

$\therefore m\angle MPB = 120^0$

(2) $\angle MPB$ आणि $\angle PQD$ हे परस्परांचे संगत कोन आहेत.

$\therefore \angle MPB \cong \angle PQD$

परंतु $m\angle MPB = 120^0$

$\therefore\ m\angle PQD = 120^0$

(3) $\angle APQ$ आणि $\angle CQN$ हे परस्परांचे संगत कोन आहेत.

$\therefore\ \angle APQ \cong \angle CQN$

परंतु $m\angle APQ \cong m\angle MPB = 120^0$

$\therefore m\angle APQ = m\angle CQN = 120^0$

**(4)** $\angle$ **BPQ** आणि $\angle$ **DQN** हे एकमेकांचे संगत कोन आहेत.

$\therefore \angle BPQ \cong \angle DQN$

परंतु $\angle$ BPQ = $\angle$ APM ………. (विरुद्ध कोन)

$\therefore m\angle BPQ = m\angle APM = 60^0$

$\therefore m\angle BPQ = m\angle DQN = 60^0$

$\therefore$ संगत कोनांच्या जोड्यांची मापे :


$m\angle APM \cong m\angle PQC = 60^0$

$m\angle MPB \cong m\angle PQD = 120^0$

$m\angle APQ \cong m\angle CQN = 120^0$

$m\angle BPQ \cong m\angle DQN = 60^0$

**5.** सोबतच्या आकृतीमध्ये रेषा **ST** || रेषा **UV** आणि रेषा **AB** ही छेदिका आहे. $\angle SCD = 4y$ आणि $\angle CDV = 3y + 26$ तर **y** ची किंमत काढा. दिलेल्या मापांवरुन इतर सर्व आंतरव्युत्क्रम कोनांच्या जोड्यांची मापे काढा.




उकल : रेषा **ST** || रेषा **UV** ची रेषा **AB** ही छेदिका आहे.

$\because \angle SCD \cong \angle CDV$ ……….. (एकरुप आंतरव्युत्क्रम कोन)

$\therefore m\angle SCD = m\angle CDV$

परंतु $\angle SCD = 4y$ आणि $\angle CDV = 3y + 26$

$\therefore 4y = 3y + 26$

$\therefore\ 4y - 3y = 26$

$\therefore\ y = 26$

$\therefore\ m\angle SCD = 4y = 4 \times 26 = 104$

$m\angle CDV = 3y + 26 = 3 \times 26 + 26 = 78 + 26 = 104$

$\therefore\ m\angle SCD \cong m\angle CDV = 104^0$

(2) $m\angle SCD + m\angle TCD = 180^0$..... (रेषीय जोडीतील कोन)

परंतु $m\angle SCD = 104^0$

$\therefore\ 104^0 + m\angle TCD = 180^0$

$\therefore\ m\angle TCD = 180^0 - 104^0$

$\therefore\ m\angle TCD = 76^0$


$\therefore\ \angle TCD \cong \angle CDU$ .......... (एकरुप आंतरव्युत्क्रम कोन)

$\therefore\ m\angle CDU = m\angle TCD = 76^0$

∴ आंतरव्युत्क्रम कोनांच्या जोड्यांची मापे :

(1) $m\angle SCD \cong m\angle CDV = 104^0$
(2) $m\angle TCD \cong m\angle CDU = 76^0$

**6.** शेजारील आकृतीमध्ये रेषा **MN** || रेषा **AB** आणि रेषा **PQ** ही छेदिका आहे.
$\angle PTN = 4x + 17$ आणि
$\angle ASQ = 2x + 43$ तर $x$ ची किंमत काढा.
दिलेल्या मापांवरुन इतर सर्व बाह्यव्युत्क्रम कोनांची मापे काढा.



उकल : रेषा MN || रेषा AB आणि रेषा PQ ही त्यांची छेदिका आहे.

(1) $\angle PTN \cong \angle ASQ$ ......... (एकरुप बाह्यव्युत्क्रम कोन)

परंतु $\angle PTN = 4x + 17$ आणि $\angle ASQ = 2x + 43$

$\therefore 4x + 17 = 2x + 43$

$\therefore 4x - 2x = 43 - 17$

$\therefore \quad 2x = 26$

$\therefore x = 13$

$\therefore m\angle PTN = 4x + 17 = 4 \times 13 + 17 = 52 + 17 = 69$

$m\angle ASQ \cong m\angle PTN = 69^0$

(2) $m\angle PTN + m\angle PTM = 180^0$........(रेषीय जोडीतील कोन)

परंतु $m\angle PTN = 69^0$

$\therefore \quad 69^0 + m\angle PTM = 180^0$

$\therefore m\angle PTM = 180^0 - 69^0$

$\therefore m\angle PTM = 111^0$

$\angle PTN \cong \angle BSQ$ ........ (एकरुप बाह्यव्युत्क्रम कोन)


$\therefore m\angle PTM = m\angle BSQ = 111^0$

$\therefore$ बाह्यव्युत्क्रम कोनांच्या जोड्यांची मापे :

(1) $m\angle PTN \cong m\angle ASQ = 69^0$

(2) $m\angle PTM \cong m\angle BSQ = 111^0$

**7.** सोबतच्या आकृतीमध्ये रेषा **AB** ∥ रेषा **CD** आणि रेषा **NR** ही छेदिका आहे. $\angle CFE = 2x + 29$ आणि $\angle FEA = 5x + 25$ तर दिलेल्या मापांवरुन इतर सर्व आंतरकोनांच्या जोड्यांची मापे काढा.




उकल : (1) रेषा **AB** ∥ रेषा **CD** आणि रेषा **NR** ही त्यांची छेदिका आहे.

$\angle CFE$ आणि $\angle FEA$ हे आंतर कोन आहेत.

आंतरकोनांच्या मापांची बेरीज $180^0$ असते.

$\therefore \angle CFE + \angle FEA = 180^0$

परंतु $\angle CFE = 2x + 29$ आणि $\angle FEA = 5x + 25$

$\therefore 2x + 29 + 5x + 25 = 180$

$\therefore 7x + 54 = 180$

$\therefore 7x = 180 - 54$

$\therefore 7x = 126$

$\therefore x = \frac{126}{7}$

$\therefore x = 18^0$

$\therefore m\angle CFE = 2x + 29 = 2 \times 18^0 + 29 = 36 + 29 = 65^0$

$m\angle FEA = 5x + 25 = 5 \times 18^0 + 25 = 90 + 25 = 115^0$

(2) $m\angle CFE + m\angle DFE = 180^0$ …… (रेषीय जोडीतील कोन)

परंतु $m\angle CFE = 65^0$

$\therefore 65^0 + m\angle DFE = 180^0$

$\therefore m\angle DFE = 180^0 - 65^0$

$\therefore m\angle DFE = 115^0$

$\angle DFE$ आणि $\angle FEB$ हे आंतर कोन आहेत.

आंतरकोनांच्या मापांची बेरीज $180^0$ असते.

$\therefore m\angle DFE + m\angle FEB = 180^0$

परंतु $m\angle DFE = 115^0$

$\therefore 115^0 + m\angle FEB = 180^0$

$\therefore m\angle FEB = 180^0 - 115^0$


$\therefore m\angle FEB = 65^0$

∴ आंतरकोनांच्या जोड्यांची मापे :

(1) $m\angle CFE + m\angle FEA = 65^0 + 115^0 = 180^0$

(2) $m\angle DFE + m\angle FEB = 115^0 + 65^0 = 180^0$

**8.** सोबतच्या आकृतीमध्ये रेषा m ∥ रेषा n आहे. रेषा $l$ ही त्यांची छेदिका आहे.
जर $a = (4x + 20)^0$ आणि $f = (3x + 20)^0$ तर $x$ ची किंमत काढा.
$m\angle a$ आणि $m\angle f$ चे माप काढा.




उकल : $a = (4x + 20)^0$ आणि

$f = (3x + 20)^0$ .... दिलेले आहे.

$\angle a \cong \angle e$........ (संगत कोन)

$\therefore m\angle e = m\angle a = (4x + 20)^0$

$m\angle e + m\angle f = 180^0$..... (रेषीय जोडीतील कोन)

$\therefore 4x + 20 + 3x + 20 = 180^0$

$7x + 40 = 180$

$7x = 180 - 40$

$7x = 140$

$\therefore x = \frac{140}{7}$

$\therefore x = 20$

$\therefore \angle a = 4x + 20$ यामध्ये $x = 20$ ही किंमत ठेवू.


$\therefore \angle a = (4 \times 20) + 20 = 80 + 20 = 100$

आणि $\angle f = 3x + 20$ यामध्ये $x = 20$ ही किंमत ठेवू.

$\therefore \angle f = (3 \times 20) + 20 = 60 + 20 = 80$

$\therefore x = 20$ , $m\angle a = 100^0$ आणि $m\angle f = 80^0$

**9.** सोबतच्या आकृतीमध्ये रेषा $p \parallel$ रेषा $q$ आणि रेषा $l$ ही त्यांची छेदिका आहे. जर $\angle 4 = 3x$, $\angle 3 = 7x + y$ आणि $\angle 7 = x + 4y$ तर $x$ आणि $y$ ची किंमत काढा.




उकल : रेषा $p \parallel$ रेषा $q$ आणि रेषा $l$ ही छेदिका आहे.

$\angle 3 = 7x + y, \angle 4 = 3x$ आणि $\angle 7 = x + 4y$...... (दिलेले आहे)

$m\angle 3 + m\angle 4 = 180^0$...... (रेषीय जोडीतील कोन)

$\therefore 7x + y + 3x = 180$

$\therefore 10x + y = 180$...... (i)

$\angle 3 = \angle 7$....... (संगत कोन)

$\therefore\ 7x + y = x + 4y$

$\therefore\ 7x - x = 4y - y$

$\therefore\ 6x = 3y$

$\therefore\ 6x - 3y = 0$ .......... (ii)

समीकरण (i) ला 3 ने गुणून, $30x + 3y = 540$ ........... (iii)

समीकरण (iii) आणि समीकरण (ii) यांची बेरीज करुन

$\therefore\ 30x + 3y + 6x - 3y = 540 + 0$

$\therefore 36x = 540$

$\therefore\ x = \frac{540}{36}$

$\therefore x = 15$

$x = 15$ ही किंमत समीकरण (i) मध्ये ठेवून,


$\therefore\ 10 \times 15 + y = 180$

$\therefore 150 + y = 180$

$\therefore y = 180 - 150$

$\therefore\ y = 30$

$\therefore x = 15^0$ आणि $y = 30^0$




**10.** सोबतच्या आकृतीमध्ये जर रेषा **m** ∥ रेषा **n** आणि रेषा ***l*** ही त्यांची छेदिका असेल तर ***x*** आणि **y** ची किंमत काढा.

उकल : $30x + 5y$ आणि $15y$ हे संगत कोन आहेत.

$$\therefore 30x + 5y = 15y$$

$$\therefore 30x = 15y - 5y$$

$$\therefore 30x = 10y$$

$$y = \frac{30x}{10}$$

$$\therefore y = 3x \ldots\ldots (i)$$

तसेच $12x + y$ आणि $15y$ हे रेषीय जोडीतील कोन आहेत.

$$\therefore \quad 12x + y + 15y = 180$$

$$\therefore 12x + 16y = 180 \ldots\ldots. (ii)$$

समीकरण (i) ची किंमत समीकरण (ii) मध्ये ठेवू.

$$\therefore 12x + (16 \times 3x) = 180$$

$$\therefore 12x + 48x = 180$$

$$\therefore 60x = 180$$

$$\therefore x = \frac{180}{60}$$


$\therefore x = 3$

आता $x = 3$ ही किंमत समीकरण (i) मध्ये ठेवू

$\therefore y = 3x = 3 \times 3 = 9$

$\therefore x = 3^0$ आणि $y = 9^0$

**11. सोबतच्या आकृतीमध्ये रेषा *a* ∥ रेषा b आहे. रेषा t ही त्यांची छेदिका आहे. दिलेल्या मापांवरुन p , ∠q आणि ∠3p ची मापे काढा.**




उकल : ∠p आणि ∠ 3p हे रेषीय जोडीतील कोन आहेत.

$\therefore m\angle p + m\angle 3p = 180$

$\therefore m\angle 4p = 180$

$\therefore m\angle p = \frac{180}{4}$

$m\angle p = 45$

$m\angle q + m\angle p = 180$....... (आंतरकोन)


$\therefore m\angle q + 45 = 180$

$\therefore m\angle q = 180 - 45$

$\therefore m\angle q = 135$

$\therefore 3p = 3 \times 45 = 135$

$\therefore m\angle p = 45^0$, $m\angle q = 135^0$ आणि $m\angle 3p = 135^0$




**12.** शेजारील आकृतीमध्ये रेषा PQ || रेषा ST ,

$\angle QPR = 60^0$, $\angle PQR = 45^0$ आणि

$\angle PRQ = 75^0$ तर

$m\angle PRS + m\angle QRT$ ची किंमत काढा.

उकल : रेषा PQ || रेषा ST

$\angle QPR \cong \angle PRS$ ....... (व्युत्क्रम कोन)

$\therefore$ परंतु $m\angle QPR = 60^0$ ..... (दिलेले)

$\therefore$ $m\angle PRS = m\angle QPR = 60^0$


तसेच $\angle PQR \cong \angle QRT$....... (व्युत्क्रम कोन)

परंतु $m\angle PQR = 45^0$ ........ (दिलेले)

$\therefore m\angle QRT = m\angle PQR = 45^0$

$\therefore m\angle PRS + m\angle QRT = 60^0 + 45^0 = 105^0$

$\therefore m\angle PRS + m\angle QRT = 105^0$




**13.** सोबतच्या आकृतीमध्ये रेषा AB || रेषा XY

आणि PQ ही छेदिका आहे. $m\angle BPQ = 80^0$ तर

$\angle PQY$ , $\angle APQ$ , $\angle PQX$ ची मापे काढा.

उकल : रेषा AB || रेषा XY आणि PQ ही छेदिका आहे.

$\angle BPQ$ आणि $\angle PQY$ हे आंतरकोन आहेत.

आंतरकोनांच्या मापांची बेरीज $180^0$ असते.

$\therefore m\angle BPQ + m\angle PQY = 180^0$

परंतु $m\angle BPQ = 80^0$

$\therefore\ 80^0 + m\angle PQY = 180^0$

$\therefore\ m\angle PQY = 180^0 - 80^0$

$\therefore\ m\angle PQY = 100^0$

$\angle BPQ \cong \angle PQX$ ........ (व्युत्क्रम कोन)


$\therefore\ m\angle BPQ = \angle PQX = 80^0$

तसेच $\angle PQY \cong \angle APQ$ ...... (व्युत्क्रम कोन)

$\therefore\ m\angle APQ = m\angle PQY = 100^0$

$\therefore\ m\angle PQY = 100^0, m\angle APQ = 100^0, m\angle PQX = 80^0$

**14.** रेषा m || रेषा n आणि रेषा *l* ही त्यांची छेदिका आहे. किरण FG हा $\angle EFD$ चा कोनदुभाजक आहे. तर $\angle a$ आणि $\angle DFP$ ची मापे काढा.




उकल : रेषा m || रेषा n आणि रेषा *l* ही त्यांची छेदिका आहे.

$\angle BEF$ आणि $\angle EFD$ हे आंतरकोन आहेत.

आंतरकोनांच्या मापांची बेरीज $180^0$ असते.

$\therefore\ m\angle BEF + m\angle EFD = 180^0$

परंतु $\angle EFD = 2a$ , $m\angle BEF = 130^0$

$\therefore\ 130 + 2a = 180$

$\therefore 2a = 180 - 130$

$\therefore 2a = 50$

$\therefore\ a = \frac{50}{2}$


$\therefore\ a = 25$

$\angle$**BEF** आणि $\angle$**DFP** हे संगत कोन आहेत.


$\therefore\ m\angle BEF = m\angle DFP = 130^0$

$\therefore\ m\angle a = 25^0, m\angle DFP = 130^0$

**15.** शेजारील आकृतीमध्ये रेषा **m** ∥ रेषा **n** आहे.
रेषा **s** व रेषा **t** या त्यांच्या छेदिका आहेत.
दिलेल्या मापांवरुन $\angle x$ व $\angle y$ ची मापे काढा.




उकल **:** आकृतीमध्ये दाखविल्याप्रमाणे $\angle a$ , $\angle b$ घ्या.




(i) रेषा **m** ∥ रेषा **n** आहे. आणि रेषा **t**
ही त्यांची छेदिका आहे.

$m\angle b = 50^0$ .....(संगत कोन)

$m\angle x + m\angle b = 180^0$

...... (रेषीय जोडीतील कोन)

$\therefore m\angle x + 50^0 = 180^0$

$m\angle x = 180^0 - 50^0$

$m\angle x = 130^0$

$\therefore$ $m\angle a = 60^0$.... (विरुद्ध कोन)

**(ii)** रेषा **m** ∥ रेषा **n** आहे आणि **s** ही त्यांची छेदिका आहे.

$m\angle a + m\angle y = 180^0$ ...... (आंतर कोन)


$60^0 + m\angle y = 180^0$

$m\angle y = 180^0 - 60^0$

$m\angle y = 120^0$

$\therefore$ $m\angle x = 130^0$ आणि $m\angle y = 120^0$ आहे.


**16.** सोबतच्या आकृतीमध्ये, रेषा **p** ∥ रेषा **q** आहे. रेषा ***l*** ∥ रेषा **m** आहे. दिलेल्या कोनांच्या मापांवरुन $\angle x, \angle y$ आणि $\angle z$ ची मापे काढा




उकल : आकृतीमध्ये दाखविल्याप्रमाणे $a$ घ्या.

**(i)** रेषा ***l*** ∥ रेषा **m** आहे आणि **q** ही त्यांची

छेदिका आहे.




$m\angle a = 70^0$...... (संगत कोन)

$m\angle a + m\angle z = 180^0$

........(रेषीय जोडीतील कोन)

$\therefore 70^0 + m\angle z = 180^0$

$\therefore m\angle z = 180^0 - 70^0$

$\therefore m\angle z = 110^0$

(ii) रेषा p ∥ रेषा q आहे आणि रेषा *l* ही त्यांची छेदिका आहे.

$\angle a \cong \angle x$ ....... (बाह्यव्युत्क्रम कोन)

$\therefore m\angle a = m\angle x = 70^0$

$\therefore m\angle x = 70^0$

(iii) रेषा *l* ∥ रेषा m आहे आणि रेषा p ही त्यांची छेदिका आहे.


$\angle x \cong \angle y$ ....... (संगत कोन)

$\therefore m\angle x = m\angle y = 70^0$


$\therefore m\angle y = 70^0$

$\therefore m\angle x = 70^0$, $m\angle y = 70^0$, $m\angle z = 110^0$ आहे.

**17.** सोबतच्या आकृतीमध्ये रेषा p ∥ रेषा q आणि रेषा *l* ∥ रेषा m. दिलेल्या कोनांच्या मापांवरुन $\angle 2x$, $\angle 3z$, $\angle 4x$, $\angle 6y$ ची मापे काढा.




उकल : आकृतीमध्ये दाखविल्याप्रमाणे $\angle a$ घ्या.




रेषा p ∥ रेषा q आहे. रेषा m ही त्यांची छेदिका आहे.

$\angle a \cong \angle 4x$ .....(विरुद्ध कोन)

$\therefore$ m$\angle a$ = m$\angle 4x$ ..... (I)

रेषा p ∥ रेषा q आणि रेषा *l* ही त्यांची छेदिका आहे.

$\angle 6y = \angle 2x$ .....(संगत कोन)....... (II)

रेषा *l* ∥ रेषा m आणि रेषा q ही त्यांची छेदिका आहे.

m$\angle 6y$ + m$\angle a$ = $180^0$ ..... (आंतर कोन)

$\therefore 2x + 4x = 180^0$.... [(I) व (II) वरुन]

$\therefore 6x = 180^0$

$\therefore x = \frac{180}{6}$

$\therefore x = 30^0$

$\therefore \angle 2x = 2 \times 30 = 60^0$ आणि $4x = 4 \times 30 = 120^0$

समीकरण (II) मध्ये $x = 30^0$ ठेवून,

$\therefore 6y = 2x = 2 \times 30 = 60^0$

रेषा *l* ∥ रेषा m आणि रेषा p ही त्यांची छेदिका आहे.

$\therefore \angle 2x + \angle 3z = 180^0$ ....... (आंतर कोन)


$\therefore 60^0 + \angle 3z = 180^0$

$\therefore \angle 3z = 180^0 - 60^0$


$\therefore \angle 3z = 120^0$

$\therefore \angle 2x = 60^0, \angle 4x = 120^0, \angle 6y = 60^0, \angle 3z = 120^0$

**18.** शेजारील आकृतीमध्ये रेषा **p** ∥ रेषा **q** ∥ रेषा **r** . जर $m\angle FBA = 140^0$ आणि $m\angle DCA = 100^0$ तर **z** ची किंमत काढा.




उकल : आकृतीमध्ये दाखविल्याप्रमाणे $\angle x$ , $\angle y$ , $\angle u$ , $\angle v$ घ्या.




रेषा **p** ∥ रेषा **q** आणि रेख **AB** ही त्यांची छेदिका आहे.

$\therefore m\angle x + 140^0 = 180^0$...... (रेषीय जोडीतील कोन)

∴ $m\angle x = 180^0 - 140^0$

∴ $m\angle x = 40^0$....... (I)

$m\angle u = m\angle x$....... (व्युत्क्रम कोन)

∴ $m\angle u = 40^0$........ (II)

रेषा q ∥ रेषा r आणि रेख AC त्यांची छेदिका आहे.

∴ $m\angle y + 100 = 180$..... (रेषीय जोडीतील कोन)

∴ $m\angle y = 180 - 100$

∴ $m\angle y = 80$

$m\angle v = m\angle y$ ....... (व्युत्क्रम कोन)

$m\angle v = 80$......... (III)

$m\angle z = m\angle u + m\angle v$


$= 40 + 80$........ [(II) व (III) वरुन]

$= 120^0$

∴ $m\angle z = 120^0$

**19.** सोबतच्या आकृतीमध्ये **AB ∥ PQ ∥ RS** आणि **∠BAR = $130^0$** ,

**∠PQR = $70^0$** तर **∠QRA** आणि **∠ARS** ची किंमत काढा.




उकल : किरण **AB** ∥ किरण **RS** आणि रेख **AR** ही त्यांची छेदिका आहे.

**∠BAR** व **∠ARS** हे आंतरकोन आहेत.

आंतरकोनांच्या मापांची बेरीज **$180^0$** असते.

∴ **m∠BAR + m∠ARS = $180^0$**

परंतु **m∠BAR = $130^0$**........ (दिलेले आहे)

∴ **$130^0$ + m∠ARS = $180^0$**

∴ **m∠ARS = $180^0 - 130^0$**

**m∠ARS = $50^0$....... (I)**

किरण **PQ** ∥ किरण **RS** आणि रेख **QR** ही त्यांची छेदिका आहे.

$\angle PQR = \angle QRS$ ........ (व्युत्क्रम कोन)

$m\angle QRS = m\angle PQR = 70^0$ ......... (II)

परंतु $m\angle QRS = m\angle QRA + m\angle ARS$


$70^0 = m\angle QRA + 50$ ...... [(I) व (II) वरुन]

$\therefore m\angle QRA = 70 - 50$

$\therefore m\angle QRA = 20$

$\therefore m\angle QRA = 20^0$ आणि $m\angle ARS = 50^0$ आहे.

**20.** शेजारील आकृतीमध्ये रेषा OP ∥ रेषा QR ∥ रेषा ST. जर $m\angle OPR = 65^0$ आणि $m\angle RTS = 55^0$ तर $m\angle a$ आणि $m\angle b$ ची किंमत काढा.




उकल : (i) रेषा OP ∥ रेषा QR आणि रेख PR ही छेदिका आहे.

$m\angle OPR$ आणि $\angle a$ हे आंतरकोन आहेत.

आंतरकोनांच्या मापांची बेरीज $180^0$ असते.

$\therefore m\angle OPR + m\angle a = 180^0$

परंतु $m\angle OPR = 65^0$......... (दिलेले आहे.)

$\therefore 65^0 + m\angle a = 180^0$

$\therefore$ m$\angle a$ = $180^0 - 65^0$

$\therefore$ m$\angle a$ = $115^0$

(ii) रेषा QR ∥ रेषा ST आणि रेषा RT ही छेदिका आहे.

∠b आणि ∠RTS हे आंतरकोन आहेत.

आंतरकोनांच्या मापांची बेरीज $180^0$ असते.

$\therefore$ m∠b + m∠RTS = $180^0$

परंतु m∠RTS = $55^0$……… (दिलेले आहे.)

$\therefore$ m∠b + $55^0$ = $180^0$


$\therefore$ m∠b = $180^0 - 55^0$

$\therefore$ m∠b = $125^0$

$\therefore$ m$\angle a$ = $115^0$ आणि m∠b = $125^0$ आहे.

**21.** सोबतच्या आकृतीमध्ये रेषा XY ∥ रेषा NS आणि रेख NS ही त्यांची छेदिका आहे.

∠NXY = $90^0$ आणि ∠SNY = $75^0$ तर $a$ ची किंमत काढा.




उकल : रेषा XY ∥ रेषा NS आणि रेषा NY ही त्यांची छेदिका आहे.

$\angle XYN = \angle SNY$.....( व्युत्क्रम कोन)

$\therefore\ m\angle XYN = m\angle SNY = 75^0$

त्रिकोणाच्या कोनांच्या मापांची बेरीज $180^0$ असते.

$\therefore\ \Delta NXY$ मध्ये,

$$m\angle NXY + m\angle XYN + m\angle XNY = 180^0$$

$$\therefore\ 90 + 75 + \angle a = 180^0$$

$$\therefore\ 165 + \angle a = 180^0$$

$$\therefore\ \angle a = 180^0 - 165^0 = 15^0$$

$$\therefore\ \angle a = 15^0$$

**22.** खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा.

**(1)** एकाच प्रतलात असणाऱ्या आणि एकमेकींना छेदणाऱ्या रेषांना एकरुप रेषा म्हणतात.

उत्तर : चूक, एकाच प्रतलात असणाऱ्या आणि एकमेकींना न छेदणाऱ्या रेषांना समांतर रेषा म्हणतात.

**(2)** जर एखादी रेषा दिलेल्या दोन रेषांना दोन भिन्न बिंदूंत छेदत असेल, तर त्या रेषेला त्या दोन रेषांची छेदिका म्हणतात.

उत्तर : बरोबर

**(3)** जर दोन समांतर रेषांना एका छेदिकेने छेदले असता संगतकोनांच्या आठ जोड्या तयार होतात.

उत्तर : चूक, जर दोन समांतर रेषांना एका छेदिकेने छेदले असता संगतकोनांच्या चार जोड्या तयार होतात.

**(4)** जर दोन समांतर रेषांना एका छेदिकेने छेदले असता आंतरकोनांच्या चार जोड्या तयार होतात.

उत्तर : चूक, जर दोन समांतर रेषांना एका छेदिकेने छेदले असता आंतरकोनांच्या दोन जोड्या तयार होतात.

**(5)** जर दोन समांतर रेषांना एका छेदिकेने छेदले असता आंतरव्युत्क्रम कोनांच्या चार जोड्या तयार होतात.

उत्तर : चूक, जर दोन समांतर रेषांना एका छेदिकेने छेदले असता आंतरव्युत्क्रम कोनांच्या दोन जोड्या तयार होतात.

**(6)** जर दोन समांतर रेषांना एका छेदिकेने छेदले असता बाह्यव्युत्क्रम कोनांच्या दोन जोड्या तयार होतात.

उत्तर : बरोबर

**(7)** दोन समांतर रेषांना एका छेदिकेने छेदले असता आठ कोन तयार होतात.

उत्तर : बरोबर

**(8)** जर दोन समांतर रेषांना एका छेदिकेने छेदल्यावर तयार होणाऱ्या कोनांपैकी संगत कोनांच्या जोडीतील कोन एकरुप असतात.

उत्तर : बरोबर

**(9)** जर दोन समांतर रेषांना एका छेदिकेने छेदल्यावर तयार होणाऱ्या कोनांपैकी व्युत्क्रम कोनांच्या जोडीतील कोन एकरुप नसतात.

उत्तर : चूक, जर दोन समांतर रेषांना एका छेदिकेने छेदल्यावर तयार होणाऱ्या कोनांपैकी व्युत्क्रम कोनांच्या जोडीतील कोन एकरुप असतात.

**(10)** जर दोन समांतर रेषांना एका छेदिकेने छेदल्यावर तयार होणाऱ्या कोनांपैकी आंतरकोनांच्या प्रत्येक जोडीतील कोन परस्परांचे पूरककोन असतात.

उत्तर : बरोबर

*****